हात.

# वाघ महाविद्यालयाच्या १७ विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ कृषी व कृषी संलग्न महाविद्यालय नाशिक येथे सर्वग्राम फिनकेअर प्रा. लि. कंपनीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नुकतेच कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कृषी, उद्यानविद्या, कृषी अभियांत्रिकी व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील १७ विद्यार्थ्यांनी निवड झालेली आहे. विद्यार्थ्यांना सरासरी अडीच लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे.

कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी मुलाखत प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला. त्यापैकी १७ विद्यार्थ्यांची सर्वग्राम फिनकेअर या कंपनीने शाखा संबंध अधिकारी (ब्रंन्च रिलेशनशीप ऑफिसर) या पदासाठी निवड केली. एकाच ठिकाणी कौशल्य प्राप्त विद्यार्थी मिळाल्याने कंपनीच्या अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

मुलाखत प्रक्रिया ॲप्टिट्यूट टेस्ट, टेक्निकल राऊंड आणि मुलाखती अशा तीन टप्प्यांत पार पडली. याप्रसंगी ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागातील प्रा. तुषार उगले, प्रा. अनिल शिंदे, प्रा. प्रसाद शेळके, प्रा. प्रवीण बस्ते यांनी कामकाज पाहिले.

संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, समन्वयक डॉ. व्ही.एम. सेवलीकर, कृषी महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

